# महिला सशक्तिकरण व लोकशाही

**डॉ. मीनाक्षी गंगाधर मिणचे** सहाय्यक प्रा. शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे महाविदयालय, मिरज.

---

***प्रस्तावना***

सशक्तिकरण म्हणजे काय हा प्रश्न प्राथमिक मूलभूत पण अत्यंत महत्त्वाचा वाटतो सक्षमीकरण ही बहुआयामी, प्रतिक्रियात्मक ,सृजनशील. प्रवाही, संकल्पना आहे कोणत्याही समाज घटकाला समाज मान्यता प्रतिष्ठा, स्वातंत्र्य, समता आणि न्याय मिळवून देण्यासाठी तसेच समाजातील विषमता, दारिद्र्य, लिंग ,वर्ण, वर्ग, धर्म इत्यादी प्रकारचे भेद तसेच जाती भेदाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी जी 'क्षमता' त्या अपेक्षित, शोषित समाजघटकांत आणावी लागते ते म्हणजे सक्षमीकरण असे मला वाटते. मग ते समाज घटक अस्पृश्य दलित पीडित आदिवासी महिला कोणीहि असो.

कायदे व कल्याण कार्यक्रमाच्या माध्यमातून आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व राजकीय या सर्व क्षेत्रांमध्ये महिलांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क व दर्जा प्रदान करून देणे, विकासासाठी समान संधी उपलब्ध करून देणे आणि स्त्री-पुरुष असमानता नष्ट करणे या प्रक्रियेला महिला सक्षमीकरण असे म्हणतात.

***अभ्यासाचा उद्देश***

1. महिला सक्षमीकरण करण्याची प्रक्रिया समजावून घेणे.
2. लोकशाही शासन व महिला सशक्तिकरण यांचा सहसंबंध अभ्यास करणे.
3. महिला सशक्तिकरणाची प्रक्रिया ही लोकशाही शासन पद्धतीत अधिक बळकट कशी होईल याकरिता उपाययोजना सुचविणे.

***अभ्यासाची गृहितके***

1. विकासाची संधी व समाजातील भेदांचे समूळ उच्चाटन करण्याची क्षमता हीच महिला सक्षमीकरणाची प्रक्रिया होय.
2. महिला सक्षमीकरणाचा हेतूने लोकशाही शासन पद्धतीतील कायदे व विकास कार्यक्रमांवर भर देणे.

महिलाच्याविकासाचा पाया म्हणून भारतीय संविधानाकडे पाहिले जाते. कारण भारतीय संविधानाने महिलांच्या विकासाकरिता मूलभूत हक्क व अधिकार देऊ केले आहेत. याशिवाय समाजातील या दुर्बल घटकांसाठी विशेष कायदे करण्याची तरतूदही घटनेमध्ये केलेली आहे. तथापि शासनाचा व समाजाचा महिलांकडे पाहण्याचा दृष्टिकोण कल्याणकारी उपक्रमाच्या लाभार्थी असाच राहिला आहे.

राष्ट्रीय स्वातंत्र्यचळवळीत दुर्बल घटकांच्या हक्काच्या चळवळीत जातीप्रथा, विषमता निर्मूलन, कामगार, शेतकऱ्यांच्या चळवळी सामाजिक सुधारणा उत्पादन प्रक्रिया यात महिलांचा सहभाग महत्त्वपूर्ण होता. स्वातंत्र्योत्तर काळात जरी शिक्षणाचे प्रमाण वाढले असले तरी एकूण सामाजिक आर्थिक राजकीय जीवनात महिलांचा अपेक्षित सहभाग वाढलेला दिसत नाही कौटुंबिक आणि सामाजिक असुरक्षितता स्थलांतर आरोग्य सेवा व अन्य दैनंदिन सुविधांचा अभाव याचा परिणाम महिलांवर प्रकर्षाने दिसू लागला. पिण्याच्या पाण्याचा अभाव दारिद्र्य

कुपोषण बालमृत्यू दर यातही गर्भलिंगनिदान चाचणी व त्यामुळे कमी होणारी मुलींची संख्या महिला व मुलींची विक्री यातून महिलांच्या मानवी हक्काची पायमल्ली होताना दिसत आहे.

विकासाची फळे ज्या प्रमाणात महिलांपर्यंत पोहोचणे आवश्यक होते. त्या प्रमाणात ती पोहोचू शकली नाहीत विशेषता: तळागाळातील महिला यापासून वंचित राहिल्या आहेत आणि यामुळे समाजात असमतोल निर्माण झाला आहे आणि या असमतोलाची दरी नष्ट करण्याच्या उद्देशानेच महाराष्ट्र शासनाने सन. 1994 मध्ये प्रथम महिला धोरण जाहीर केले , तसेच कालानुरूप झालेल्या बदलांचा विचार करून शासनाने सन .2001 मध्ये दुसरे ''महिला धोरण ''जाहीर केले या दोन्ही धोरणांमध्ये प्रामुख्याने महिलांवरील अत्याचार, हिंसा ,महिला विषयक कायदे ,त्यांच्या आर्थिक दर्जात सुधारणा, प्रसारमाध्यमांची भूमिका, स्वयंसेवी संस्थांचा सहभाग, महिलांना केंद्रस्थानी मानून नियोजन ,स्वयंसहाय्यता बचत गटांचा विकास महिलांविषयीचे हक्क व कायदे याबाबत जनजागृती यावर प्रामुख्याने भर देण्यात आला या दोन्ही धोरणाच्या अनुषंगाने महिलांच्या विकासाच्या विविध बाबींवर विशेष लक्ष केंद्रित केले त्याचे फलित म्हणजेच महिलांची शिक्षणातील प्रगती त्यांच्या आरोग्यातील सुधारणा, महिलांचा मालमत्तेतील हक्क, महिलांविषयक कायद्याबाबत जनजागृती याबरोबरच शासकीय शासकीय व निमशासकीय यत्रणेमध्ये नोकरीच्या संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने पंतप्रधान राजीव गांधी यांच्या दूरदृष्टीतून आलेले नोकरी व उच्च शिक्षण यात 30 टक्के महिला आरक्षण तसेच राजकीय व स्थानिक स्वराज्य संस्थेत 33 टक्के महिला आरक्षण करण्यात आले पुढे राजकीय क्षेत्रातील महिलांचा सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने स्थानिक संस्थांमध्ये महिलांसाठी 50 टक्के आरक्षण करण्यात आले तसेच महिला आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करून बचत गटांच्या चळवळीद्वारे महिलांना आर्थिक पाठबळ मिळाले व त्यांचा आत्मविश्वास वाढला यासारख्या ठळक बाबी प्रामुख्याने महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणाकरीता उपयुक्त ठरत आहेत

महाराष्ट्राच्या विकासाचा चढता आलेख आहे आणि तो तसा असण्यामध्ये महिलांचे मोलाचे योगदान आहे प्रत्येक क्षेत्रात महिला प्रगतीपथावर आहेत ही बाब निश्चितच महाराष्ट्राला भूषणावह आहे महिलांकरिता करण्यात आलेल्या धोरणांचा हा परिणाम आहे या लोकशाही शासन पद्धती शासनाने महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने विविध योजना व कार्यक्रम राबवले आहेत ते पुढील प्रमाणे

1. निराधारांसाठी शासनाचा आधार

निरक्षित महिलांसाठी स्वयंसेवी संस्थांमार्फत आधार गृहाची निर्मिती केली व त्यांना दरडोई मानधन दिले जावू लागले तसेच या महिलांना घराचे भाडे ,औषध, प्रसाधन याबाबी व साहित्य दिले जाते ज्या महिलांचा सांभाळ करणारे कोणी नाही त्यांना आश्रय देऊन त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी सुद्धा शासकीय महिला राज्यगृहे स्थापन केलेली आहेत. परितक्त्या, कुमारीमाता, संकटग्रस्त अशा महिलांना आश्रय देण्यासाठी आश्रय स्थान उपलब्ध करून दिलेली आहेत

2. बालिका समृद्धी योजना- या योजनेअंतर्गत कुटुंबातील जास्तीत जास्त दोन मुलींसाठी अर्थसहाय्य दिले जाते

3. इंदिरा गांधी महिला संरक्षण योजना - समाजातील पीडित महिलांसाठी इंदिरा गांधी संरक्षण योजना राबवली जाते या योजनेअंतर्गत पीडित महिलांचे पूर्णपणे पुनर्वसन होईपर्यंत मानधनाच्या स्वरूपात मदत दिली जाते

4. देवदासी पुनर्वसन योजना

या योजनेअंतर्गत देवदासी मुलींना विवाहासाठी दहा हजार रुपयांचे अनुदान दिले जाते शिवाय शिक्षणासाठी पाचशे ते सहाशे रुपयांपर्यंतचे अनुदान ही दिले जाते

5. महिलांसाठी व्यावसायिक प्रशिक्षणाची योजना

पंधरा वर्षावरील निराधार, निराश्रित राखीव गटातील महिला व विधवा महिलांना व्यावसायिक प्रशिक्षण उपलब्ध करून दिले जाते शिवाय विद्यावेतन ही दिले जाते

6. महिला बचत गट

महिलांना स्वतःचा उद्योग, व्यवसाय उभारता यावा. दुःखातून त्यांची सुटका व्हावी स्वावलंबी जीवनाचा लाभ त्यांना मिळावा या उद्देशानेच बचत गटांची निर्मिती केली आहे व या बचत गटांच्या मदतीतून त्यांना अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जात आहे

एकंदरीतच महिलांच्या विकासाकरिता या कार्यक्रमाची व योजनांची अंमलबजावणी केली जात आहे.

***निष्कर्ष***

1. महिला सक्षमीकरणासाठी शासनाने राबविलेल्या योजना व कार्यक्रम हे समजावून घेतले

2. महिला सक्षमीकरणासाठी महिलांना कायद्याद्वारे सामाजिक, शैक्षणिक आर्थिक व राजकीय विकासाची संधी उपलब्ध करून दिली जात आहे

3. लोकशाही शासन पद्धतीने राबवलेल्या विविध योजना व कार्यक्रम ही महिला सक्षमीकरणाकरीता उपयुक्त व मार्गदर्शक ठरत आहेत

***समारोप***

एकंदरीतच भारतीय शासन पद्धतीनुसार महिलांच्या सक्षमीकरणासाठी अनेक विकासात्मक योजना व कार्यक्रमांवर भर दिला जात आहे व समाजातील उपेक्षित ,दुर्लक्षित महिलांना विकासाची समान संधी उपलब्ध करून दिली आहे

संदर्भ सूची

1. डॉ. स्वाती कर्वे, महिला सशक्तिकरण एवं ग्रामीण महिला
प्रतिमा प्रकाशन, प्रथमावृत्ती ,2003.
2. डॉ. स्वाती कर्वे , स्त्री विकासाच्या पाऊलखुणा
प्रतिमा प्रकाशन,द्वितीय आवृत्ती, 2005.
3. डॉ. नीलम गोरे , समाज आणि महिला
पद्मगंधा प्रकाशन , द्वितीय आवृत्ती 2007
4. इंटरनेट
5. वर्तमानपत्रे